महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २२६२०३०४
Web: www.msbae.org.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 22620304
Web: www.msbae.org.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-कशिमं/ शाऊप २०२५/पाच/ 192 दिनांक: 19 MAR 2025

वाचावे : १) महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र.कशिमं/ शाऊप २०२५/पाच/१३९, दिनांक २५.०२.२०२५

२) महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे शुध्दिपत्रक क्र.कशिमं/ शाऊप २०२५/पाच/१६२, दिनांक ०६.०३.२०२५

३) महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र.कशिमं/ शाऊप २०२५/पाच/१६६, दिनांक ०७.०३.२०२५

४) कला संचालनायालचे पत्र क्र.डिओओ-२०२५/दोन/४७०, दिनांक १७.०३.२०२५

## परिपत्रक

उपरोक्त संदर्भाधीन क्र. १ वरील परिपत्रकान्वये महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाकडून आयोजित करण्यात येणाऱ्या शासकीय उच्चकला परीक्षा २०२५ करिता कला परिसंस्थांची नोंदणी, विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे व परीक्षा शुल्क विहित कालावधीत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यावावत कळविण्यात आले होते.

तथापि, काही कला परिसंस्थांनी परीक्षेकरिता अद्यापही ऑनलाईन पध्दतीने नोंदणी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे. प्रस्तुत प्रकरणी कळविण्यात येते की, ज्या कला परिसंस्थांनी आपल्या कला परिसंस्थेची नोंदणी, परीक्षेस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे तसेच परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने अद्यापही सादर केलेले नाहीत, अशा कला परिसंस्थांना सदरचे ऑनलाईन कामकाज करण्यासाठी दिनांक २६.०३.२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानुसार, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन संबंधित कला परिसंस्थांच्या प्राचार्यांनी पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

नियामक परिषदेच्या दिनांक १७.०३.२०२५ रोजीच्या बैठकीत मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी दिलेल्या निर्देशानुसार ज्या कला परिसंस्था उपरोक्त अंतिम दिनांकापर्यंत परीक्षेकरिता आपल्या कला परिसंस्थेची नोंदणी, परीक्षेस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने सादर करणार नाहीत, अशा कला परिसंस्थेतील विद्यार्थ्यांना उच्चकला परीक्षेस प्रविष्ठ होता येणार नाही. तसेच, कला परिसंस्थेची नोंदणी व परीक्षा आवेदनपत्र किंवा परीक्षा शुल्क वरील अंतिम दिनांकापर्यंत सादर न केल्यामुळे पात्र विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहील्यास तसेच यासंदर्भात भविष्यात कोणताही पेचप्रसंग उद्भवल्यास त्यास सर्वस्वी कला परिसंस्थेचे प्राचार्य व संबंधित कला संस्थेचे अध्यक्ष/सचिव जबाबदार राहतील याची सक्त नोंद घेण्यात यावी.

(विनोद दांडगे)
संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई.

प्रति,

१) प्राचार्य, संबंधित शासनमान्य अशासकीय कला परिसंस्था.

२) अध्यक्ष/सचिव द्वारा प्राचार्य, संबंधित शासनमान्य अशासकीय कला परिसंस्था.

प्रत : माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.

१) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर.

२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.

३) विभाग प्रमुख, कला शिक्षक प्रशिक्षण /शिल्पकला व प्रतिमानबंध विभाग, सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई

४) कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक दोन, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

५) उपसचिव (कला), महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय,
मुंबई/नागपूर/छत्रपती संभाजीनगर.

६) निवड नस्ती.